" माणसं माणसाला बदलण्यासाठी, एकमेकांची मनोधारणा बदलण्यासाठी एकत्र येतात हा पारंपरिक संपर्कक्रियेमागचा सामाजिक संकेत आहे. "

जर्नलिझम स्टयूडंट्स असोसिएशन
पुणे विद्यापीठ

पारंपरिक संज्ञापन माध्यमे

डॉ. अशोक रानडे

जर्नलिझम स्टयूडंट्स असोसिएशन
पुणे विद्यापीठ

१९८३ च्या डॉ. सी. रो. जगन्नाप स्मृति व्याख्यानाची संहिता पुस्तिकारूपाने प्रसिद्ध करण्यास आम्हाला आनंद होत आहे. या पुस्तिकेच्या प्रकाशनासाठी डॉ. सी. रो. जगन्नाप स्मारक समितीने आर्थिक साहाय्य दिले आहे हे कृतज्ञतेने नमूद केले पाहिजे. व्याख्यानाच्या ध्वनिफितीवरून संहिता लिहून काढण्याचे काम कु. विद्या व सीमा कुलकर्णी यांनी केले. कु. सीमा कुलकर्णीने मुद्रणप्रत तयार केली. उपमुद्रिते तपासण्यात कु. उज्ज्वला लेले व सीमा कुलकर्णी यांचे साहाय्य झाले. विभागातील शिक्षकेतर सहकाऱ्यांचे साहाय्यही वेळोवेळी व मनःपूर्वकतेने लाभले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच जर्नलिझम स्टयूडंट्स असोसिएशनला ही पुस्तिका प्रसिद्ध करणे शक्य होत आहे.

पारंपरिक संज्ञापन माध्यमे

डॉ. अशोक रानडे

डॉ. सी. रो. जगन्नाप स्मृति व्याख्यान

१९८३

प्रकाशक आणि मुद्रक :

प्र. ना. परांजपे
अध्यक्ष,
जर्नलिझम स्टचूडंट्स असोसिएशन
द्वारा : संज्ञापन आणि वृत्तपत्र-विद्या विभाग
फर्गसन महाविद्यालय रस्ता
पुणे ४११००४.

मुद्रण स्थळ :

संज्ञापन आणि वृत्तपत्र-विद्या विभाग
पुणे ४११००४

किंमत : तीन रुपये

प्रकाशन : २३ फेब्रुवारी १९८४



डॉ. सीताराम रोडाजी जगझाप

१५ जून, १९३० – ८ डिसेंबर, १९७७

मनमाडजवळील नायडोंगरी येथे जन्म व शालेय शिक्षण. स. प. महाविद्यालय, पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण. पुणे विद्यापीठातून दोन स्वतंत्र विषयात एम्. ए. 'कम्युनिकेशन प्रोसेस इन इंडियन डेमॉक्रसी विथ् स्पेशल रेफरन्स टु इकनॉमिक डेव्हलपमेंट' या विषयावर प्रबंधलेखन करून पीएच्. डी. (मार्गदर्शक–प्रा. व. म. सिरसीकर). नोकरी करून पद्व्युत्तर शिक्षण घेतले. प्राथमिक शिक्षक, कोल्हापूर कम्युनिटी प्रॉजेक्ट, जिल्हा माहिती अधिकारी (महाराष्ट्र शासन) अशा विविध पदांच्या अनुभवानंतर १९६८ मध्ये वृत्तपत्र-विद्या विभागात अधिव्याख्याता. उत्साही, मनमिळावू आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून लौकिक. विद्यार्थ्यांना अभ्यास-सहलीसाठी दिल्लीला घेऊन गेले असताना हृदयविकाराने मृत्यू.

अशोक दामोदर रानडे

जन्म : २५ नोव्हेंबर १९३७.

एलूएल्. बी. १९६०, एम्. ए. (मराठी) १९६२, एम्. ए. (इंग्लिश) १९६४.

पं. गजाननराव जोशी, पं. लक्ष्मणराव बोडस, पं. प्रल्हाद गानू आणि पं. बी. आर. देवधर यांच्याकडे हिंदुस्तानी कंठसंगीताचे शिक्षण. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाकडून 'संगीताचार्य' ही पदवी.

आकाशवाणीवर काही वर्षे नोकरी. नंतर सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई येथे व्याख्याते. मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे पहिले संचालक (१९६८–८३), ऑक्फर्डमधील वोल्फसन महाविद्यालयाच्या कोल्सन इन्डॉलॉजी फेलोशिपचे मानकरी (१९७९), 'संगीताचे सौन्दर्यशास्त्र' (१९७१), 'लोक संगीत शास्त्र' (१९७५). 'स्ट्रॅव्हिन्स्कीचे सांगीतिक सौन्दर्यशास्त्र' (१९७५) या ग्रंथांचे लेखक. 'भारतीय संगीत आणि संगीतकार' व 'मराठी नाट्यसंगीत' हे दोन ग्रंथ मुद्रणाधीन. आवाज–संगोपनाचे अनेक अभ्यासवर्ग घेतले. भारतात, परदेशात आणि दूरचित्रवाणीवर संगीत – आस्वादाचे अध्यापन. अनेक नाटके व माहितीपटांचे संगीत–दिग्दर्शन.

" अध्यक्ष महाशय आणि मित्रहो, पारंपरिक माध्यमांविषयी बोलायचं असं ठरवूनही मी एक चूक केली. ती म्हणजे माध्यमांविषयी मला जे काही बोलाचंय् ते लिहायचा प्रयत्न केला. आणि नंतर लक्षात आलं की हे काही तडीस जाणारं काम नाही. त्यामुळं चूक सुधारली आणि लिहिणं सोडून दिलं. सांगण्याचा उद्देश असा की जर विवेचनात थोडासा सैलपणा राहिला तर तो सुधारलेल्या चुकीचा परिणाम आहे हे आपण लक्षात घ्यावं. आणि दुसरं असं की विषय संपूर्णपणे मांडला जाणार नाही, आणि म्हणून थोडीशी चर्चा झाली तर, 'मी असं म्हणणारच होतो' असं म्हणायची पळवाट मला मोकळी राहील ! मी माझे विवेचन मर्यादित वेळ मुद्दाम डोळ्यांसमोर ठेवून करणार आहे. कारण मला या विषयावर झालो तर प्रश्नोत्तर हवी आहेत. कारण पारंपरिक माध्यमांचा जो अतिशय महत्त्वाचा विशेष म्हणजे मौखिक परंपरा, त्यात प्रश्नोत्तरांना फार महत्त्वाचं स्थान आहे.

इथं ज्या तऱ्हेने संज्ञापन हा शब्द वापरला गेला त्याविषयी मला काहीच म्हणायचं नाही. पण मी फार काळ संपर्क हा शब्द वापरत आलेलो आहे. तेव्हा सवयीचा बळी म्हणून मी हाच शब्द वापरणार आहे. हा अधिक बरोबर, हा अधिक चूक असं मला काहीही म्हणायचं नाही. मला स्वभावतः जाणवलेला हा शब्द आहे. आणि म्हणून विद्वानांनी तेवढी चूकभूल समजून घ्यावी. 'पारंपरिक संपर्क माध्यमे' असा मी माझा विषय ठेवलेला आहे. दरवेळेस परिभाषेच्या बाबतीत थोडीशी चर्चा होणारच. आपल्याला नेमका कुठला अर्थ अभिप्रेत आहे हे सांगेपर्यंत ही चर्चा जास्त जोरात चालावी. परंतु मला काय अभिप्रेत आहे हे कळल्यावर मला वाटतं की आपण अधिक लवकर मुद्द्यावर येऊ.

परिभाषेविषयीची चर्चा सोडता मला असं वाटतं की संपर्क क्रियेचा, म्हणजे त्याच्या परंपरेचा वेध घ्यायच्या आधीसुद्धा संपर्कक्रियेविषयीचा अतिशय महत्त्वाचा विशेष लक्षात घ्यायला पाहिजे, तो म्हणजे संपर्कक्रिया ही द्वीदिश असते. ज्या तऱ्हेने आधुनिक काळामधे संपर्कक्रियेविषयी बोललं जातं, त्यामधून देणंघेणं ही क्रिया तितकी समोर येत नाही. पण पारंपरिक संपर्कक्रियेमधे दुमुखीपण अंगभूत आहे. त्याच्यात देणंही आहे आणि लगेच घेणंही आहे. आणि घेण्यामुळे किंवा प्रतिसाद मिळाल्यामुळे देणाऱ्यात होणारा फरक हा सुद्धा त्याच्यामधे आहे. संपर्कक्रिया म्हटल्याबरोबर ती दोन दिशांची असते. घेणाऱ्याचा प्रतिसाद हा तिच्यामधला महत्त्वाचा घटक असतो, त्या प्रतिसादामुळे देणारा जे देत असतो तेही बदलत जाते.

पारंपरिक संपर्कक्रियेचं पहिलं अधिक महत्त्वाचं जर कुठलं लक्षण असेल तर तिचा दुमुखीपणा हे आहे. आज या संस्थेमधे या विषयाच्या अभ्यासकांना आवर्जून सांगण्याचा भाग असा की, संपर्कक्रिया काही मानवापुरती मर्यादित नाही. संपर्कक्रिया ही ज्यांना अमानवी म्हणता येईल अशा सजीव प्राण्यांतही शक्य आहे. आणि आपण जरी सर्व भूतमात्रांची भाषा ती आमची भाषा अशी अध्यात्मिक भूमिका घेणार नसलो तरीसुद्धा अमानवी व्यक्ती आणि मानव यांच्यातसुद्धा संपर्कक्रिया चालूच असते. कधी कधी आपल्याला जेव्हा जनावरांची भाषा, पक्ष्यांची भाषा असं म्हणावंसं वाटतं, तेव्हा आपल्या मनामध्ये असलेला व्यापक 'मी' वाट शोधत असतो असं म्हणावं लागेल. संपर्कक्रिया हा विषय घेतला तर सर्वांचा विचार करायला हवा. मगाशी बोलताना दळणवळण इ. अर्थ पूर्वी होते असं परांजपे म्हणाले. मला असं वाटतं की दळणवळण किंवा रस्ते संपर्कक्रियेचा एक भाग आहे. फक्त आपण बोलत असताना भाषेवर आधारित व्यवहार डोळ्यांपुढं ठेवतो. त्यामुळं संपर्कक्रियेचा अर्थ आपण संकुचित करून घेतलेला आहे. हा अर्थात आपल्या स्वातंत्र्याचा भाग आहे. आपल्याला ज्याचा अभ्यास करायचा तेवढ्यापुरता आपण अर्थ जरूर मर्यादित करून घेऊ शकतो. मात्र या व्यापक जाणिवेचा प्रतिध्वनी आपल्याला परंपरेत उमटलेला जरूर दिसेल. म्हणून त्याचा आपण थोडासा विचार करू. आणखी एक महत्त्वाचा तात्त्विक मुद्दा म्हणजे माध्यमे आणि साधने यात फरक केला पाहिजे. आणि हे पुन्हा बोलत असताना पारंपरिक विचारच मी डोळ्यासमोर ठेवलेला आहे.

परंपरेच्या दृष्टीनं माध्यमं कुठली आहेत, हे पहाताना पंचेंद्रियांची भाषा वापरावी लागेल. कान, डोळे, नाक, स्पर्श इ. इ. म्हणताना माझ्याद्वारे जे काय असतं ती संपर्कमाध्यमे. मग याच्यामध्ये संपर्काच्या यंत्रणा तयार होतात त्यांना साधनं म्हणायचं. माध्यम व साधन यांच्यात भेद आहे. माध्यमाचा एक विशेष असा की एकच एक माध्यम कधीही विशिष्टपणे समोर येत नाही. पारंपरिक

संपर्कक्रियेचा दुसरा अर्थ आहे समाजाच्या अखंड विचार - आचारसरणीतून प्रतीत होणारे व्यवहारभेद. या संदर्भात पारंपरिक म्हटल्यानंतर आज जो अर्थ आपल्यात रूढ आहे, तो लागू होत नाही. पारंपरिक याचा अर्थ परंपरेत उभं रहातं ते, एवढाच होतो.

आजचा अर्थ निराळा आहे. एखाद्या समाजाचा औद्योगिक युगात प्रवेश झालाय असं आपण मानलं नाही किंवा प्रगत युगाचे निकष त्याला लागू पडत नाहीत असं मानल्यास तो पारंपरिक असं कुठंतरी मानलं जातं अशा समाजाची लक्षणं पाहिली तर पुढं लक्षात येईल की खेड्यामधे जो रुजलेला असतो तो व ज्यात रूढीचाच सर्वसाधारणपणे जास्त वापर असतो तो, इ. लक्षणं वापरली जातात. आणि म्हणून पारंपरिक म्हणजे 'लोक' (folk) असा कुठंतरी अर्थ निघतो.

हा अर्थ मला मान्य आहे की नाही हा वेगळा मुद्दा आहे. पारंपरिक याचे दोन्ही अर्थ लक्षात घेणे जरुरीचे आहे असं मला वाटतं. म्हणून आपण जरी पारंपरिक म्हणजे 'लोक' (folk) असा अर्थ घेणार असलो तरी दुसरा एक पदर या संज्ञेला आहे एवढी जाणीव ठेवणं अतिशय आवश्यक आहे. अशा तऱ्हेनं विचारा पुढं चालवायला लागल्यावर, 'लोक' म्हणजे पारंपरिक माध्यमं असं म्हटल्यानंतर पंचेंद्रियांच्याद्वारे, संवेदना घेण्याचे जे मार्ग आहेत ती सगळी माध्यमं, आणि या माध्यमांच्यामध्ये संवेदना घालणाऱ्या ज्या काही यंत्रणा तयार हव्यात ती साधनं अशा व्याख्या मिळत जातात. यानंतर आणखी एक भाग रहातो. तिथं आपण थोडी राजवाड्यांची उसनवारी करू शकतो. 'विकार आणि विचार प्रदर्शनाची साधने' या विषयांवर त्यांचा एक मोठा, अतिशय मौलिक लेख आहे. त्यांनी प्रदर्शन हा जो शब्द वापरलेला आहे, तो कुठल्या अर्थानं हे आपल्या सरळ लक्षात येईल. इथं संपर्क क्रियेशीच ते जाऊन भिडलेले आहेत. त्यांना असं सांगायचंय की विचारही प्रकट होत असतो आणि विकारही प्रकट होत असतो. आपल्या दृष्टीने विकार म्हटला की ज्याला आपण कला म्हणतो त्याच्याशी संज्ञा जाऊन भिडवतो आणि विचार म्हणजे ज्ञानव्यापार असंही धरून चालतो.

म्हणजे पुन्हा असं आपल्याला दिसेल की, पारंपरिक संपर्क माध्यमांच्यामधून काय काय साधलं जातं हे जर पाहिलं तर असं म्हणता येईल की, ज्याला आजच्या जगात महत्त्व आहे त्या वृत्तपत्रासारखे, वृत्तप्रसारण हे माध्यमांचं एक काम असू शकतं. दुसरं काम तुमच्या भावनिष्ठा बदलणं. तिसरं काम केवळ माहिती देणं हे असू शकेल तर चौथं म्हणजे कथन करणं. संपर्कक्रियेची चारी कार्यं भाषिक आणि निर्भाषिक अशा दोन्ही तऱ्हेनी साधली जातात. पारंपरिक माध्यमांची आपण जर उदाहरणं मांडायची म्हटलं तर सहज मांडता येतील. वृत्तप्रसारणाचं काम पूर्वी कोण करत होतं? या संदर्भात पोवाडा ही आपल्याला सहज आठवण्यासारखी गोष्ट आहे. निर्भाषिक नमुना कुठला? तर सांकेतिक वस्तू इकडून तिकडे पाठवल्य

जात, किंवा अजूनही जातात. याला 'वृत्त पाठविणे' असं म्हणत येईल. किंवा आणखी एक मला मजेचा दिसलेला भाग म्हणचे करपल्लवीची भाषा. माहिती कळवण्यासाठी किंवा बातमी पसरवण्यासाठी किंवा कांही लोकांनाच ती कळावी म्हणून करपल्लवीची भाषा असते. कथनाकडे आपण आलो तर पुराणं आपल्याला माहीत आहेत, प्रवचनं माहीत आहेत. यात कथा सांगितली जाते. रंजनाचा एक भागही त्यात असतो. हा झाला भाषिक प्रकार. निर्भाषिक म्हटला तर आपल्याला असं दिसतं की, काही खेळ असे असतात की ज्यामध्ये वस्तूचा वापर केला जातो. यामधे आपल्याला निर्भाषिकता दिसते.

अर्थात यात भाषेचा भाग नसतोच असं आपण कुठेही म्हणत नाही आहोत. आपण असं बघत आहोत की, ही सगळी साधनं आपल्याला वापरता येतात का? तर येतात, आणि त्याचा जर एकंदर नकाशा मांडायचा म्हटला तर तो नकाशा असा असू शकेल. भावस्थिती निर्माण असं मी ज्याला म्हणतो आहे ते पुढच कार्य. जयजयकार ही जी संपर्क-क्रिया आहे ती भावस्थिती निर्माण करणारी आहे. म्हणजे एका कुठल्यातरी भावनेला आवाहन असते आणि ती आवाहन करण्याची भाषा 'पोहोचवायची' आहे. आणि आधी म्हटलेल्या आद्य लक्षणाप्रमाणे तिथे देवाणघेवाण पाहिजे. कुठेही नुसतं देणं नाही, लगेच घेणं आहे. शिवाय घेण्याऱ्याची प्रकृती बदलणं हाही एक भाग आहे. आणि म्हणून जयजयकाराचं मी उदाहरण दिलं.

आणखी एक उदाहरण आहे. आपण परंपरेने, आपल्याला सामोरा दुसरा माणूस आल्यानंतर काय म्हणू? रामराम म्हणू. जय गंगामाई म्हणू. ज्याला आपण 'ग्रीटिंग्ज' असं म्हणतो. हे जे उद्गार आहेत ते पारंपरिक उद्गार आहेत. त्यांच्यामधे काय केलं जातं तर, भावस्थिती निर्माण केली जाते. उद्देश तो असतो त्यांचा. आणि म्हणून त्याला आपण म्हटलं भावस्थिती निर्माण करणारा संपर्काचा एक उपयोग, संपर्क-क्रियेचा एक वापर.

हा झाला भाषिक. निर्भाषिक म्हटला तर आणखी मजा दिसते. ज्याला वंदन करणं असं म्हणू. आपल्याकडे वंदन कुणाला करायचं, किती करायचं, कसं करायचं याचे अगदी निश्चित नियम ठरलेले आहेत. किती वाकायचं यालाही निश्चित नियम आहेत. त्यासाठी जपानकडे जाण्याची काहीही आवश्यकता नाही! आपण जर आपल्या आजूबाजूला पाहिलं तर हे आपल्याला निश्चितपणे कळू शकेल. आणि परंपरेत याला निश्चित अर्थ पण आहे. आणखीही उदाहरणं आहेत. समजा, वेगवेगळ्या धर्मपंथांमधे टिळा लावणे वा मुद्रा करणं यांना विशिष्ट अर्थ आहे आणि त्यामुळे भावस्थिती निर्माण होते. आपल्याला ही उदाहरणं अमक्याची आहेत हे कळतंच असं नाही. कारण या सगळ्यांना आपल्या विचाराच्या चौकटीत आपण स्थान दिलेलं नाही.

त्यानंतर आणखी एक मजेचा प्रकार म्हणजे हसणं आणि रडणं. हे निर्भाषिक

संपर्कक्रियेचे भावस्थिती निर्माण करणारे अविष्कार आहेत, सर्व माणसं, सर्व संस्कृती सारख्या तऱ्हेनं हसत नाहीत आणि रडतही नाहीत. याचेही संकेत ठरलेले आहेत. सर्व प्रसंगांना या दोन्ही क्रियांचा उपयोग सारखा होतो असेही नाही. याचेही संकेत ठरलेले आहेत अर्थात अजूनपर्यंत याच्या शाळा निघालेल्या नाहीत! तरीही आपण विचारतो की तुम्ही कसे वागलात हो? तर आपण म्हणतो, आम्हाला शिकवणच अशी मिळाली, किंवा आपल्याला वळणच असं मिळालं. तर असं वळण दिलं जातं तेव्हा ते शब्दांत दिलं जात नसतं.

आता माहिती देण्याच्या कार्याकडं पहा. उदाहरणार्थ वचनं किंवा दोहे. तुम्हाला माहिती आहे की पूर्वी आणि आजसुद्धा कुडमुडे जोशी असतात ते येतात किंवा आपण सहदेव भाडळींची वचनं ऐकतो. आपण म्हणतो, भाद्रपदात पाऊस पडेल हे वचनात सांगितलं जातं. किंवा काळे ढग आल्यानंतर अमकं होईल, अमका पक्षी उडायला लागल्यानंतर तमकं होईल, हे जे आहे ते सगळं वचनामधे सांगितलं जातं. माहिती पुरविण्याच्या या बाबी आहेत. पूर्वी जेव्हा ग्रामसंस्था होती तेव्हा या सगळ्या संस्था होत्या, माहिती देणारी माणसं होती. त्यासाठी त्यांना दिलं जाणारं, परत घेतलं जाणारं असंही काहीतरी होतं.

या उलट निर्भाषिक भाग कुठला? उदाहरणार्थ पगड्या, पागोटी, वेषभूषा किंवा जनावरांवर करण्यात येणाऱ्या खुणा. तुम्ही पाहिलं असेल की जनावरांच्यावर खुणा केलेल्या असतात. मलाही बरेच दिवस हे काय आहे ते कळलं नाही. मध्यंतरी एकदा राजस्थानविषयी वाचत असतांना असा भरपूर पुरावा मिळाला की एकंदरीत सोळा तऱ्हेच्या खुणा असतात आणि त्या कोण कुणाचा वंशज आहे हे कळावं म्हणून वापरल्या जातात. कुठल्या खुणा असल्या की कुठल्या जनावराबरोबर समागम होऊ शकतो आणि व्हावा ही माहिती झाली. याच्या मागचे जे निश्चित सिध्दांत, ज्याला ठोकताळे म्हणू, त्यांचा नियम बनवण्यात आलेला आहे आणि तो संपर्कक्रियेद्वारे दुसऱ्यांपर्यंत पोहोचवला जातो. ही उदाहरणं, आधी म्हटल्याप्रमाणं खूप वाढवता येतील.

या पार्श्वभूमीवर जर आपण पारंपरिक संपर्कक्रियेचे विशेष बघायला लागलो तर आढळणारा पहिला विशेष म्हणजे मौखिक परंपरा. मौखिक परंपरा म्हणजे अशिक्षितांची असा समज होतो. पण ते तसं नाही. एकंदरीत भारतामध्ये ज्या काळामधे लिप्या प्रचारात आल्या, त्याच्या आधीपासून आणि त्याच्यानंतरसुध्दा मौखिक परंपरेवर कायम भर राहिला. त्याला कारण लिहिण्याच्या लिप्या अवघड होत्या, साधनं मुबलक नव्हती, किंवा लोक आळशी होते, असं काहीही नसून बोलल्या जाणाऱ्या शब्दालाच महत्त्व होतं. हा एक सांस्कृतिक निर्णय आहे. याच्या मागे कुठलीही अक्षमता नाही. 'मजबुरीका नाम महात्मा गांधी' असं नाही. लिप्या भरपूर असतांना, लिहिता येत असतांना, कागद झाले असतांना सुध्दा माणसानं

बोलायचं आणि बोललेल्या शब्दावर विश्वास ठेवायचा हा सांस्कृतिक निर्णय होता. तेव्हां मौखिक परंपरा म्हणजे अशिक्षितांना सहजपणे लाभलेली परंपरा असं नसून विशिष्ट सांस्कृतिक निर्णय घेतला गेल्यामुळे बोलल्या जाणाऱ्या शब्दावर दिलेला भर होय.

मौखिक याचा अर्थ आपण बोलणं असा धरतो. बरोबर आहे ते. परंतु बोलणं याच्याबरोबरच त्याचं दुसरं अंग श्रवणही आहे. आणि श्रवणक्रियेलाही तितकंच महत्त्व या परंपरेत दिलेलं असतं. आपण जर कधी संपर्कक्रियेची या प्रकारची उदाहरणं पाहिली तर असं दिसेल की, जिथेजिथे कथन केलं जातं तिथे कथन कसं करावं याचे जसे नियम असतात तसंच श्रवण कसं करावं याचेही त्याच परंपरेत नियम असतात. आणि आपल्या परंपरेत असे भरपूर नियम आहेत. एक साधं उदाहरण कलेचं म्हणून घेतो. गाणं कसं ऐकावं याचेही नियम आहेत. आणि आपल्याला माहीत आहे की, कशाही रीतीने गाणं ऐकणारा माणूस हा श्रोत्यांना आणि गायकांना दोघांनाही प्रिय होत नाही. त्याचे नियम नक्कीच ठरलेले आहेत आणि हे काही मुगल अमदानीपासून आलेले नाहीत. हे नियम भरतानेसुद्धा सांगून ठेवलेत आणि आपल्याला माहीत आहे की, आपण 'ऑडियन्स रिॲक्शन' असं म्हणून कसा भारदस्त शब्द वापरला याच्या खुषीत असतो. त्या श्रोतृवृंदांच्या प्रतिक्रिया कशा नोंदल्या जाव्यात याची भरताने लक्षणे दिलेली आहेत.

श्रोतृवृंद काय म्हणतो हे कळावं आणि जे कळलेलं आहे त्याचा अर्थ काय तो त्यांनी त्या नाटकाच्या प्रयोगकर्त्यापर्यंत पोहोचवावा. म्हणजे पुढच्या प्रयोगात बदल व्हावा. जिथं प्रयोग असतो, जिथं मौखिक परंपरा असते, तिथं श्रवणालाही महत्त्व असतं. श्रवण ही क्रिया ढोबळ गोष्ट नसून नेमकेपणाने करण्याची क्रिया आहे. असा त्याचा अर्थ आहे. आणि म्हणून आपल्याला ज्ञानेश्वरांच्या आवाहनातही 'लक्ष देऊन ऐका' असे म्हणण्याऐवजी 'अवधान' हा शब्द दिसतो. हा 'अवधान' हा शब्द वेगळा आहे. केवळ लक्ष देणे नव्हे. 'हिअरिंग' व 'लिसनिंग' हा जसा फरक करू तसा आहे. हिअरिंग ही जर केवळ शारीरिक क्रिया धरली तर लिसनिंग म्हणजे आस्था अधिक शारीर क्रिया असा होतो. आणि म्हणून अवधान हा शब्द संगीतशास्त्रातही भरपूर वापरला गेलाय. आठव्या शतकातही वापरला गेलाय. आणि म्हणून मला वाटतं, हाही पुन्हा अपघात नाही.

मौखिक परंपरेनं श्रवणावर भर दिला, श्रवण कसं करावं हे सांगितलं आणि मग त्याच्या पुढचा भाग लिखितावरचा भर स्पष्ट करणारा. म्हणून मग स्मरणशक्तीवर भर जास्त येतो. स्मरणशक्ती कशी वाढवावी याचे नियम सांगितले जातात. स्मरणशक्तीचा उपयोग कसा करावा याचेही नियम सांगितले जातात. लोकहितवादी काहीही म्हणाले आणि त्यांचे भक्तही पुढे काहीही म्हणाले की, वेदपठण करण्यामध्ये अपव्यय होतो–शक्तीचा आणि वेळेचा, तरी ते तितकंसं खरं

नाही. ह्यांच्यामधून काही शक्ती तयार होतात, कसं ऐकावं आणि कसं लक्षात ठेवावं याच्या. मला वाटतं, मौखिक परंपरा चांगल्या तऱ्हेने आमच्याकडे आहे. आणि म्हणून इथे तिचा नेमका अर्थ मिळू शकतो. जिथे जो नेमका अर्थ मिळतो तो घेऊन तुम्ही या क्रियांचा अर्थ शोधला पाहिजे. म्हणून साहित्यिकांमध्ये जेव्हा मला असं दिसतं की, साहित्यावर भर आहे आणि वाङ्मयावर नाही तेव्हा त्याचा अर्थ सरळ असतो. श्रवण आणि बोलणं या दोन्ही क्रियांचा समन्वय त्यांना साधता आलेला नाही. ते लिखितांचे गुलाम झालेले असतात. म्हणून हे सगळं झालेलं असतं.

पुढचं लक्षण म्हणजे शब्दाची प्रतिष्ठा वाढते. शब्दाची प्रतिष्ठा म्हणजे काय तर दिला घेतला जाणारा शब्द हा मानापमानाशी निगडीत होतो. व्यवहार सिद्ध होणं न होणं हे त्या शब्दावर अवलंबून असतं. म्हणून आपल्याकडे नेहमी असं दिसतं की, 'मी तुला वचन दिलं' असं म्हणतात. 'त्यानं मला शब्द दिला, त्यानं आपला शब्द पाळला नाही.' म्हणजे आता तुम्ही एकदा बोललात की ती काळ्या दगडावरची रेघ झाली. ही रेघ आणि हा काळा दगड नंतरचा आहे. जेव्हा शब्दाला शब्दाचं वजन पुरे पडेना तेव्हा लोक दगडाचा आश्रय घ्यायला लागले ! त्या क्षणापासून, जेव्हापासून ही म्हण अस्तित्वात आली तेव्हापासून, आपण लिखिताकडे झुकायला लागलो असं म्हणायला हरकत नाही.

नंतरचं लक्षण गुरु ही संस्था. (गुरूंचे अनेक प्रकार आहेत.) जे काही सत्य असेल असेल, जे काही ज्ञानामध्ये अढळ, अटळ, दीर्घकाळ टिकणारे, सर्वांसाठी लागू होणारा असा जो भाग असेल तो थोडा आहे. त्याच्या पलीकडे जो असतो, तो व्यक्तिनुसार बदलणारा भाग असतो. तेव्हा जो बदलणारा भाग असेल तो लिहून ठेवायची गरज नाही. जो बदलणारा नसेल तो लिहून ठेवला पाहिजे. म्हणून सूत्रबद्धता, सूत्रामध्ये लिहून ठेवायचं. त्याचं भाष्य जे असेल ते गुरुनं त्याच्या प्रत्येक शिष्याला त्याचा अधिकार, कुवत यांनुसार सांगायचं. म्हणून गुरु जन्माला आला. ब्राम्हणांची मिरासदारी म्हणून गुरु आले नाहीत. कारण ब्राम्हणांपेक्षा इतर जातीतले गुरुही होते. आणि त्यांचं काम तेच होतं की, अर्थ उलगडून सांगायचा. आणि म्हणून गुरु ही संस्था महत्त्वाची ठरते. पुन्हा आपण जेव्हा गायनाकडे लक्ष द्याल तेव्हा आपल्या लक्षात येईल की गुरु याला महत्त्व काय ? असं सांगितलं जातं की, गुरु हा केवळ विद्या देत नाही, 'नजर' देतो. नजर असा फार चांगला शब्द वापरला जातो. आपण 'इन्साईट' म्हटलं की खूष होतो पण हा त्यातला अधिक नेमका आणि जुना, रूढ झालेला शब्द, तो सहसा आपल्याला आठवत नाही !

यानंतरचं लक्षण नादाची प्रतिष्ठा. नाद म्हणजे कानाला जाणवणारी अशी एक गुणवत्ता की जिची व्याख्या करता येत नाही पण जी कार्य साधून जाते. नादामधून काही सुचवायचं आहे. 'त्याचा नादच बघून घ्या, पुढं बोलू नका,' असं सांगण्याचा जो परिपाठ असतो त्याचं कारण हे असतं. या नादाची उदाहरणं

भरपूर देता येतील, नादब्रह्म का म्हटलं जातं वगैरे वगैरे. नादब्रह्म, परब्रह्म याच्यामध्ये फार अंतर नाही हा संगीत–परंपरेचा नेहमीचा दावा. संगीतकारांना हे साधो न साधो, त्यांना हे वाटत असतं हे मला महत्त्वाचं वाटतं. एखाद्या संस्कृतीमध्ये रूढ होणारी समीकरणं ही काही वेळा त्यांना स्वप्नासारख्या वाटणाऱ्या उच्च गोष्टी सांगणारी असू शकतात. हे कुठंतरी जाणवलंय आणि त्यांचा प्रयत्न तिकडं आहे याचं दिग्दर्शनही ती करतात. या तऱ्हेनं मौखिक परंपरेचे खूप तपशीलात वर्णन करता येईल. आपण थोडं पुढे जाऊ.

पारंपरिक संपर्कक्रियेत दिसणारा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे पारंपरिक संपर्कक्रियेला ओशाळेपणा न वाटता प्रबोधन करायची हौस असते. ती असं निश्चितपणे सांगते की मला तुम्हाला काहीतरी सुचवायचंय्. कलाविचारक जेव्हा ही कला आहे, कलेत काही सुचवलं जाऊ नये असं म्हणायला लागले, तेव्हा ते पारंपरिक संपर्कक्रियेकडं तुच्छतेनं बघायला लागले. यामागचं रहस्य काय असावं असा जर विचार केला तर मला असं वाटतं, माणसानं माणसाशी संपर्क साधणं म्हणजे दोघांनी बदलणं ही गोष्ट यांना मान्य आहे. असं जर होत नसेल तर त्या संपर्काला काही अर्थच नाही. मी तुमच्याशी बोललो म्हणजे तुमच्यात काहीतरी बदल घडला. तुम्ही माझं ऐकून घेतलं म्हणजे माझ्यात काहीतरी बदल घडला. ही त्याच्यामागची श्रद्धा असल्यामुळं शिकवताना लाज वाटायचं काहीही कारण नाही, हे संपर्कक्रियेचं गृहीत तत्त्व आहे. म्हणून पारंपरिक संपर्कक्रिया–तिला तुम्ही कला म्हणा वा नका म्हणू–तुम्हाला शिकवते, शिकवायचा प्रयत्न करते आणि म्हणून त्याच्यामध्ये पुनरावृत्ती खूप असते. विश्लेषण करतांना हे लक्षात येईल. पुनरावृत्तीचं कारण काय, तर कुठली तरी गोष्ट ठसवून सांगणं. मनावर ठसवण्याचा निश्चय, आणि या निश्चयामागची कार्यप्रेरणा ही प्रबोधनाची आहे.

माणसं माणसाला बदलण्यासाठी, एकमेकांची मनोधारणा बदलण्यासाठी एकत्र येतात हा पारंपरिक संपर्कक्रियेमागचा सामाजिक संकेत आहे, असं मला वाटतं. आणि म्हणून 'व्यक्तिनिष्ठ कला', 'व्यक्तिनिष्ठ आविष्कार' ही गोष्टच मुळी पारंपरिक क्रियेला मान्य नाही. कारण ती व्यक्ती म्हणून जरी आमच्यासमोर आली तरी समूहाचा घटक म्हणून येते. आणि समूह हा समाजाचा प्रतिनिधी म्हणूनच आमच्यासमोर येतो. तेव्हा आम्ही व्यक्तीला काही सांगत असतो, तेव्हा ते समूहाला सांगत असतो. आणि समूहाला जेव्हा सांगत असतो, तेव्हा ते समाजालाही सांगायचं असतं, असं आमचं म्हणणं आहे. आणि म्हणून आम्हाला व्यक्तिनिष्ठता मान्य नाही. त्यामुळं 'लेकी बोले, सुने लागे' या प्रमाणं बोलायचं एकाला, पण दुसऱ्याला उद्देशून ! किंवा याचं आधुनिक उदाहरण म्हणजे लिहायची डायरी पण ती प्रकाशित होईल म्हणूनच लिहायची ! तुम्ही आमचे लक्ष्य नाही तर केवळ निमित्त आहात हे सांगण्यामागचा उद्देश.

त्यानंतरचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पारंपरिक संपर्कक्रियेला कुठल्याही प्रकारची विशुद्धता मान्य नाही, सर्व तऱ्हेची संमिश्रता हा त्याचा विशेष आहे. आविष्कार-मार्ग पण विविध आहेत, प्रेरणा पण बहुविध आहेत. एकाच वेळेला रंजन पण करणार, माहिती पण देणार. एकाच वेळेला कथन पण करणार, तुमची भावस्थिती पण बदलणार. आणि एकाच वेळेला आम्ही 'दृक्' पण पहाणार 'श्राव्य' पण चाहणार. हा असा आमचा ठरलेला निर्णय आहे. म्हणून ही जी आमची ठरलेली संमिश्रता आहे, ती संमिश्रता आपल्याला बावचळून टाकते. संपर्कक्रियेची संमिश्रता कशासाठी तर, त्यातील काही अंश तरी प्रत्येकापर्यंत पोहोचेलच. संमिश्र प्रेरणा व संमिश्र आविष्कार-मार्ग ही त्याची ताकद आहे. पुढं मागं आपल्या लक्षात येईल की, लोककला व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांना स्पर्श करतात, असं जेव्हा आपण म्हणतो त्यावेळी आपण संपर्कक्रियेचा साधा संकेत सैद्धांतिक भाषेत मांडत असतो इतकंच.

पारंपरिक संपर्कक्रिया तशा मोठ्या हिशेबी पद्धतीने पुढे जात असतात. म्हणजे सर्वच गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या असं त्यांना म्हणायचं नाही आणि म्हणून विश्लेषण करतांना जाणवतं की त्यात सर्व गोष्टी असल्या तरी केन्द्र तर नक्की असणार. इथं पुण्यात मानसशास्त्रीय सौंदर्यशास्त्राची, सौंदर्यविज्ञानाची, सौंदर्य-मीमांसेची जोरदार फळी असतांना एक मुद्दा मांडायला मला जरा भीती वाटते ! पण संपर्कक्रियेचाच प्रतिनिधी असल्यानं 'मला कशाची भीती?' म्हणून एक मुद्दा मी इथं मांडू इच्छितो. पारंपरिक संपर्कक्रियेनं आपल्या अनेक शतकांच्या कारागिरीमुळं ज्याला प्रयोगवैज्ञानिक म्हणता येईल अशा सत्याला हात घातलेला आहे. आणि त्या सत्याकडं आपलं दुर्लक्ष झालंय्. म्हणजे असं की, माणसाच्या व्यक्तिमत्वामधे आणि नंतर त्याच्या मज्जासंस्थेत वगैरे वगैरे जी केंद्रे आहेत त्यातली काही एक-मेकांच्या जवळ आहेत तर काही लांब आहेत. आणि त्यामुळे 'सहचेतना' निर्माण होते. म्हणजे मी गाणं ऐकत असताना रंगांची प्रतिमा माझ्या डोळ्यासमोर जागृत होते. सहचेतना विकृती आहेत असं समजायचा आपल्या मनामधे भाव आला म्हणून आपण या शक्ती गमावल्या, अशी या संपर्कक्रियांची धारणा असते.

त्यांचं म्हणणं असतं की जेव्हा तुम्ही ऐकत असता तेव्हाच तुमच्या पहाण्याच्या प्रतिमासृष्टीवरही आम्ही परिणाम करू शकतो. उदाहरणार्थ भारतभर पूजन केलं जातं. आता पूजन हा एक विधी आहे. विशिष्ट गुणावस्था साधायची आहे, त्यावेळेला नाद, गंध कुठले वापरायचे याचे निश्चित संकेत सर्व भारतभर सारखेच आहेत. आणि यामध्ये हा सहचेतनेचा सिध्दांत आहे असं मला सुचवायचं आहे. जी गोष्ट भारतभर आठव्या शतकापासून यशस्वीपणे रूढ झालेली दिसत आहे, त्याच्यामागं प्रयोगवैज्ञानिक सत्य आहे असं मी धरून मागे जाणार आहे. मला उलटं जायचं नाही कारण माझ्या दृष्टीने ही सुलटी प्रक्रिया जाहे. आमच्यामधे रूढ झालेले अनु-

भव सत्य असं धरून जर बघायला गेलं तर आम्हाला हे दिसणार आहे. मी मागं धर्म आणि संगीत हा विषय मांडला तेव्हा याचा उच्चार केला होता. आज पुनरुच्चार करतो. कारण संपर्कक्रियेत पुनरुच्चाराला महत्त्व आहे !

संपर्कक्रिया पारंपरिक असतांना तिला ढोवळ अर्थाचं फार आकर्षण असतं. कारण तिचं असं म्हणणं आहे की, ढोबळ अर्थच सगळ्यांना समजतो. सूक्ष्म गुंतागुंती, अर्थच्छटा यांचं आम्हाला कर्तव्य नाही. आम्हाला सर्वांना समजेल तो ढोबळ अर्थ सांगायचाय्. तो सर्वांना समजण्यासाठी जे जे करायचं, ते ते आम्ही करू ही आमची प्रतिज्ञा आहे. आणि म्हणून श्रोते हे आमचे ईश्वर. म्हणजे कोण? तर श्रोते, सगळे लोक नव्हे. आमच्यासमोर जो मूर्त रुपाने हजर आहे तो आमचा ईश्वर. ज्ञानेश्वरांपासून जाणवलेली ही गोष्ट आहे. आणि ही गोष्ट त्यांनाच जाणवायची कारण त्यांना श्रोत्यांवर परिणाम साधावयाचा होता. मुख्य काय सांगायचं याच्यापाशी येणं याला महत्त्व असतं. आपण म्हणतो ‘ हरदासाची कथा मूळ पदावर. ’ हे वास्तव वर्णन आहे आणि ही प्रयोगविज्ञानातील महत्त्वाची गोष्ट आहे की, तुम्ही मूळ मुद्यावर येणं हे महत्त्वाचं आहे. आणि हे सोपं नाही. परंतु कीर्तनकार हरदासाकडे हे कौशल्य असतं. तर म्हणून पारंपरिक संपर्कक्रिया ‘ साचेबंदपणा ’ ही शिवी ‘ गुण ’ म्हणून धारण करते.

पारंपरिक संपर्कगाराच्या एकूण भाषेतील महत्त्वाचा भाग म्हणजे त्याने हेरलेल्या साचेबंद प्रतिक्रिया. आणि आपल्याला असं दिसतं की, हे प्रतिसाद ठरीव असतात. असं का? कारण या प्रतिसादामागं एक मूल्यनिर्णय आहे. आणि हा बहुधा ‘शिव’ कल्पनेशी निगडीत असतो. साचेबंद प्रतिक्रिया वगैरे योग्य गोष्ट आहे. कारण एकूण समाज साचेबंद प्रतिक्रियांवर जगत असतो. जे बंडखोर असतात ते समाजात रहातच नसतात. आणि संपूर्ण समाजानं बंडखोर व्हायचं ठरवलं तर बंडखोर कुणीच रहाणार नाही ! म्हणून साचेबंद प्रतिक्रिया हेरायच्या, त्यांना निश्चित राबवणाऱ्या यंत्रणा उभ्या करायच्या, त्याच्यासाठी अविष्काराची तंत्रं वापरायची आणि सर्वांमागे कुठंतरी शिवकल्पनेचं कोंदण ठेवायचं ही पारंपरिक संपर्कक्रियेची योग्य अशी व्यूहरचना आहे. आणि एकदा त्यात अडकल्यावर ती मान्यच करावी लागते. हीच त्याची ताकद आहे.

पारंपरिक संपर्कक्रियेला व्यक्तीचं जसं वावडं आहे तसंच काहीही मूकपणे व्हावं याचंही वावडं आहे. त्यामुळं ती प्रयोगावर आधारित आहे. आधुनिक युगामध्ये आल्यानंतर वाचण्याचं जर उदाहरण घेतलं तर मी असं म्हणेन की, मूकपणे वाचन पारंपरिक संपर्कक्रियेला मान्य नाही. मोठ्यानंच वाचलं पाहिजे. माणूस जेव्हा नवेपणे वाचायला शिकतो तेव्हा तो मोठ्यांदा वाचतो. जरा पुढं गेला की अगदी मोठ्यांदा वाचत नाही. पण ओठांची हालचाल करतो. अगदी शांतपणे वाचणं वगैरे यानंतरची क्रिया. परंतु या सगळ्या क्रियांतून तो जातो. म्हणून पारंपरिक

संपर्कक्रिया म्हणते की, तुम्ही हे सगळं केलं पाहिजे. कुठलाही पारंपरिक संपर्कक्रियेतला माणूस तुम्ही जर नुसतं बोलायला लागलात तर म्हणेल, नुसतं बोलू नका.—करून दाखवा प्रत्यक्ष काय ते.

म्हणजे पारंपरिक गोष्टींमधे प्रयोगावरचा भर ही दोन तऱ्हेची पावती आहे, असं मला वाटतं. एक तर असं की, प्रत्येकाला केल्याशिवाय कळत नाही ही त्यामागची श्रद्धा आहे. म्हणजे सर्व क्रिया या शारीर व्हायला पाहिजेत. केवळ मानसिक अशी क्रिया असूच शकत नाही आणि केवळ शारीरही असू शकत नाही. उदाहरणार्थ, पूजा करण्याच्या विधीत पुजाऱ्याने श्रीकृष्णाला वंदन केलं की सर्वांनीं वंदन करावं, ही त्यामागची भावना आहे. अर्थात या सामूहिक क्रिया एकावेळी होणं यात कुठंतरी सहानुभूतीचा भाग असतो. जरा वेगळ्या उदाहरणाचा आश्रय घ्यायचा असेल तर, जेव्हा मुंबईमध्मे नाटकं सुरू झाली, तेव्हा मुंबईतले प्रेक्षक प्रत्येक प्रसंगात उद्‌गार काढायचे. नुसतं बघणं त्यांना शक्यच नव्हतं.

जेव्हा जेव्हा मौखिक परंपरेला उजाळा द्यावा असं भारतभर वाटलं, त्या त्या वेळेला प्रत्येकानं त्यात सहभागी व्हावं ही जाणीव आली. म्हणून आपल्याला नवनाट्य म्हटलं की प्रेक्षकांचा सहभाग महत्त्वाचा वाटला. कारण पारंपरिक क्रियेप्रमाणे सर्वांपर्यंत पोहोचणं महत्त्वाच वाटायला लागलं. आणि सगळ्यांपर्यंत पोहोचणं म्हणजे सगळ्यांनी त्यात सहभागी होणं. हे समजायला आपल्याला पाश्चात्यांची मदत का लागावी? हा आश्चर्याचा मुद्दा. पारंपरिक क्रिया मागासलेली हा संभ्रम आपण डोक्यातून काढून टाकला, पारंपरिक म्हणजे सांस्कृतिक परंपरेत जिवंत असते ती, असा जिवंत अर्थ मनात घेतला तर अजून आपला संवाद साधू शकेल. गायक म्हणून मला याचं कौतुक वाटत आलंय् की, आपण गात असताना दुसऱ्याला गावंसं वाटणं ही यशाची पावती आहे. बालगंधर्व जेव्हा गायचे तेव्हा पहिल्यांदा वाटायचं किती साधं आहे हे, आपणही गाऊ शकू. हे वाटणं माझ्यादृष्टीनं महत्त्वाचं आहे. तसं जमत नसेल ही गोष्ट वेगळी.

पारंपरिक संपर्कक्रियेचे काही विशेष, मला जाणवलेले व ज्याच्याविषयी पुष्कळ काही करता येईल ते, मी आपल्यापुढे मांडले. इथं आपण थांबू.